PRINCIPAL
Lala Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Dist. Parbhani
05

Impact Factor-7.675 (SJIF)
ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

October - 2020

**ISSUE No - CCXLVII ( 247)**

# Ideology of Mahatma Gandhi

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director

Guest Editor
Dr. R.K.Ippar
Principal

Executive Editor
Dr. B.K. Shep,
Head, Dept. of History

Executive Editor
Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

Executive Editor
Prof.(Dr.) V.B. Gaikwad ,
P.G. Coordinator, Science

Jawahar Education Society's

**Vaidyanath College Parli- Vaijnath,Dist. Beed.**

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 247 | October,2020

Late Ramesh Warpudkar College, Sonpeth Dist. Parbhani


| | | |
|---|---|---|
| 41 | महात्मा गांधींचे स्त्रियांविषयीचा मानवतावादी दृष्टीकोन<br>डॉ. जयश्री महाजन /कांचन हिलाल देसले | 158 |
| 42 | महात्मा गांधी आणि अस्पृश्यता प्रा. कांबळे शिवरजी ईरबा | 162 |
| 43 | महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार डॉ. मा.धो.कच्छवे | 165 |
| 44 | Role Of Women In Mahatma Gandhi S Freedom Movement<br>डॉ. के.के. आहुजा | 168 |
| 45 | म. गांधी यांची सत्याग्रहाविषयी भूमिका प्रा. डॉ. गोविंद काळे | 170 |
| 46 | असहकार चळवळीत महात्मा गांधींची भूमिका<br>प्रा.डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ | 173 |
| 47 | गॉधी और मानव अधिकार डॉ. प्रिया सोनी खरे | 177 |
| 48 | महात्मा गांधीजींचे महिला सक्षमीकरणातील योगदान<br>प्रा.डॉ.काशिलिंग रघुनाथ गावडे | 179 |
| 49 | महात्मा गांधीजींची विचारधारा राहसे दिनेश टेट्या | 184 |
| 50 | महात्मा गांधीचे ग्रामोद्योगा विषयी विचार व कार्य<br>प्रा.डॉ. दीपक पां. लोणकर | 191 |
| 51 | गांधीजींचे जीवन शिक्षण प्रा. डॉ. भुजंग पाटील | 196 |
| 52 | गांधीजींचे शैक्षणिक धोरण प्रा. डॉ. भास्कर माने | 199 |
| 53 | महात्मा गांधी कालीन पत्रकारिता डॉ.भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी | 202 |
| 54 | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार प्रा.डॉ. बी. आर. शिंदे | 206 |
| 55 | महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्या संदर्भातील विचार<br>डॉ.देवर्षा मुकंद अरविंद डॉ.बाळासाहेब वि.मुंडे | 209 |
| 56 | महात्मा गांधीजींची वर्धा शिक्षण योजना (१९३७) व शैक्षणिक राष्ट्रीय धोरण २०२० : एक अभ्यास श्री. अजितकुमार भिमराव पाटील | 212 |
| 57 | भगवद्गीता व महात्मा गांधी प्रा.डॉ.जाधवर बापू देवराव | 220 |
| 58 | ऑनलाइन शिक्षा वर्तमान संकट की वैकल्पिक व्यवस्था डॉ. रीना गुप्ता | 222 |
| 59 | महात्मा गांधींची आर्थिक विकेंद्रिकरणाची संकल्पना आणि आजची परिस्थिती कु. लीना ना. पुप्पलवार | 227 |


Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth
CamScanner

peth 31516 Parbhani College

# महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार

प्रा.डॉ. बी. आर. शिंदे
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि परभणी ( वाणिज्य विभाग )

महात्मा गांधी हे सामाजीक, राजकीय, धार्मीक, आभ्यासक असुन त्याच बरोबर ते आर्थिक अभ्यास होते. म. गांधीनी आपले आर्थिक विचार मांडताना भारतातील लोकांच्या परिस्थितीचा अभ्यास केला. भारतातील लोकंची सामाजिक, धार्मिक , राजकीय, त्याच बरोबर आर्थिक परिस्थिती दैनिच होती. भारतातील आर्थिक दृष्टया मागास असलेल्या लोकांची आर्थिक उन्नती व्हावी म्हणून गांधीजीनी स्वदेशीदेशीचा नारा दिला. म्हणजेच आपल्या देशातील लोकांनी उत्पादन केलेल्या वस्तू आपल्या लोकांनी खरेदी केल्या पाहिजे आणि आपल्या उत्पादकाला चार पैसे मिळाले पाहिजे अशी भुमीका गांधी यांची होती. भारतात वेगवेगळया जाती धर्माचे लोक राहातात. म. गांधी यांना जाती व्यवस्था मान्य नव्हती परंतु गांधी हे वर्ण व्यवस्थेचे पुरस्कर्ते होते. वर्णा नुसार लोकांचा जो व्यावसाय आहे तो त्यांनी केला पाहिजे. आणि त्यांच्या व्यावसायाचे स्वरूप लघु आणि कुटीर उद्योग असे असले पाहिजे. आणि ते यांत्रिक नसावे असे मत गांधी यांचे होते. कारण देशात उत्पादकात स्पर्धा वाढली नाही पाहिजे. आणि प्रत्यके व्यक्तीला काम मिळाले पाहिजे. अशी भुमीका म. गांधी यांनी त्यांच्या लिहीलेल्या लेखातून व त्यांनी दिलेल्या भाषणातून दिसुन येते. गांधी यांच्या आर्थिक विचारावर्ती टॉलस्टॉय व रास्किन यांच्या विचाराची प्रभाव होता. गांधी हे आपले आर्थिक विचार मांडताना त्यांनी भारतातील नैसर्गीक साधन संपती व मनुष्यबल चा दोन घटकाला महत्व देतात अशा प्रकारे म. गांधी यांनी देशातील जनतेच्या आर्थिक विकास व्हावा म्हणून सतत प्रयत्न केले. आपल्याला या लेखात गांधी यांच्या आर्थिक प्रकास टाकावयाचा आहे. त्यासाठी म. गांधीनी काही महत्वाच्या बाबी सांगीतल्या आहेत त्या खालील प्रमाणे.

## १ मोठया उद्योगाना विरोध

म. गांधी यांची मोठया उद्योग व्यावसायांना विरोध तर लहान उद्योग मोठया प्रमाणात निर्माण केले पाहिजे असे मत गांधीजी यांचे होते. कारण भारत हा गरीब देश असुन आपल्या देशात दारिद्रयाचे प्रमाण ज्यास्त आहे. त्यामुळे भारतात छोटे—छोटे उद्योग निर्माण केले पाहिजे. व ग्रामीन भागातील कुठीर उद्योगाचे सवरक्षण केले पाहिजे. या उदयोगाचा विकास केला पाहिजे. त्यातून देशातील दारिद्रय कमी होइल असे मत गांधीजीचे होते. गांधी मोठया काही उद्योगानी छोटे उद्योग नष्ट करू नये. तर या उद्योगाचा विकास झाला पाहिजे. या उद्योगाना प्रोत्साहन दिले पाहिजे. कारण लहान उद्योगामुळे देशातील बेकाराना रोजगार मिळेल, त्याच बरोबर त्यांचा आर्थिक विकास होइल. आणि विदेशी व्यापार कमी होउन विदेशात जाणारे भांडवल थांबेल. व त्यातून देशाचा आर्थिक विकास होइल. त्याच बरोबर गांधीजी म्हणत देशातील ग्रामीण अर्थव्यवस्था विकसीत झाली पाहिजे. ग्रामीण अर्थव्यवस्था विकसीत करण्यासाठी प्रत्येकानी प्रयत्न केले पाहिजे. ग्रामीण उद्योगांना उदा. खादी, चरखा, इ. चालना दिली पाहिजे. कारण ग्रामीण भागात राहाणाऱ्या तरूणाना व बेकाराना काम निर्माण करून देणारा हा एकमेव मार्ग आहे. व हा मार्ग देशातील लोकांची आर्थिक परिस्थिती पायता अतीशय योग्य आहे. म. गांधी यांच्या मते ग्रामीण अर्थव्यवस्था ही खादी उद्योगावर आधारीत आहे. आणि खादी उद्योग हे देशातील लोकांच्या भावनांन वर आधारीत आहे. म्हणून म. गांधीनी स्वदेशी वस्तूच्या खरेदीचा नारा दिला होतो. कारण स्वदेशीबदल देशातील प्रत्यके व्यक्तीची भावना किंवा निष्ठा प्रेमाची असेत. त्यातून आपल्या देशात निर्माण



CamScanner

केलेल्या वस्तू बदल प्रेम जिव्हाळ असतो. त्यामुळे म. गांधीनी या छोटया उद्योगाना चालना दिली त्यातून देशातील बेकाराना रोजगार व त्याचा आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला.

०२ गांधी यांची विश्वस्त कल्पना

गांधी यांची विश्वस्त ही संकल्पना आर्थिक विचार मांडताना महत्वाची मांडली जाते. कारण ती नितीमुल्यावर आधारीत आहे. गांधीजी म्हणतात जगातील जी साधन संपती आहे ती इश्वराच्या मालकीची आहे. या संपतीवर जगातील प्रत्यके व्यक्तीचा हक्क आहे ती संपती निर्माण करताना देशातील प्रत्यके व्यक्तीने योगदान दिलेले असते परंतू जगातुन प्रत्यके व्यक्तीकडे संपती समाना राहाणार नाही म्हणजेच ती कमी जास्त राहिल एखादया व्यक्ती जवळ जास्तीची संपती असेल तर त्यानी समाजात एक विश्वस्त म्हणुन काम कराव दृ त्यांनी गरीबाच्या कल्यानासाठी सतत प्रयत्न केले पाहिजे. गरीबाची आर्थिक उन्नती झाली पाहिजे असे मत गांधी याचे होते. कारण समाजात आर्थिक दरी निर्माण झाली तर समाजात त्याचा उद्रेश होउ शकतो त्यासाठी समाजात आर्थिक समानता झाली पाहिजे. त्यासाठी श्रीमंत व्यक्तीनी आपल्या गरजा मर्यादित खेल्या पाहिजे. व जी संपती शिलक राहील त्याचा उपयोग गरीब समाजाच्या आर्थि विकासासाठी प्रयत्न केला पाहिजे. त्याचा परिणाम समाजातील आर्थिक विषमता कमी होउन समाजात समानता निर्माण होईल. जर श्रीमंतानी गरीब समाजाला सहकार्य करन नये असे गांधीजी म्हणतात गांधीजीनी विश्वस्त कल्पना जी मांडली ती समाज आणि देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

०३ यांत्रीकीकरणाला विरोध

म. गांधी हे लहान लहान उद्योग आणि श्रमातून उत्पादन निर्मिती याचे पुरस्कर्ते होते. म्हणुन त्यांनी यांत्रीकीकरणाला विरोध केला. कारण भारण हा आर्थिक दृष्टया गरीब लोक होते जर पांरपारीक पध्दतीने उत्पादन केल्यास प्रत्येक व्यक्तीच्या हाताला काम मिळेल व भांडवल कमी लागेल आणि व्यावसायाचे केंद्रीकरण होणार नाही. आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होणार नाही. असे मत गांधीजीचे होते परंतु व्यावसायाचे यांत्रीकीकरण झाल्यास व्यावसाय आणि आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होइल त्याचा परिनाम , भारतीय समाजावर होउन ते आळसी बनतील ते परावलंबी होतील व मोठया प्रमाणात देशात बेकारी व दारिद्रय वाढेल असे गांधीजीना भिती वाटे म्हणून म. गांधी यांत्रीकीकरणाल विरोध करीत असत.

०४ वर्ग सघंर्ष टाळ्ला पाहिजे.

समाजात वेगवेगळी वर्ग एकमेकाशी गुण्यागोवीदने राहांवेत यासाठी समाजातील आर्थिक विषमता कमी नाही झाली तर वर्ग सघंर्ष निर्माण होइल आणि ते समाजासाठी घातक असेल त्यासाठी गांधी यांनी राज्यविहीन समाजरचनेचे स्वप्न पाहीले होत. हे गांधीजीचे स्वप्न पुर्ण करावयाचे असेल तर देशातील भांडवल दारानी आणि इतर वर्गातील चांगला समन्वय असला पाहीजे. म. गांधीनी त्यासाठी हृदय परिवर्तनाचा मार्ग दाखवला आहे. गांधीजी म्हणतात समाजात अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यात अनेक प्रश्न आपण निर्माण करतो. कारण मानुस मर्यादीत गरजा घवून जगत नाही. तो आपल्या गरजा वाढवत जातो. त्या गरजा पुर्ण करण्यासाठी पैसा लागतो. तो पैसा मिळवीण्यासाठी अनेक मार्गानी समाज प्रयत्न करतो एवढेच नव्हेतर भविष्यात गरजा पुर्ण करण्यासाठी पैसाचा संग्रह यात श्रीमंत श्रीमंत होतो. गरीब गरीब राहातो करत राहातो. त्याच्या परिणाम समाजात आर्थिक विषमता निर्माण होते. त्यातुन समाजात संघर्ष निर्माण होण्याची शश्क्यता असते. त्यामुळे समाजातील भांडवल दार वर्गानी आपल्या गरजा पुर्ण करताना सर्व सामाण्याचा विचार केला पाहीजे. सर्व सामान्य समाजा कडे पाहुन श्रीमंतानी आपल्या गरजा मर्यादीत ठेवून साधे पणाने जगले पाहीजे. चालुन गांधीजी म्हणतात समाजाचे अनेक प्रश्न सुटतील व समाजील संघर्ष न होता समन्वय प्रस्थावीत होइल . यातुन समाजाचे अनेक प्रश्न सुटतील.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) –7.675, Issue NO, 247
ISSN : 2278-9308
October,2020

६५ पारंपारीक उद्योग

म. गांधी यांनी पारंपारिक उद्योगाला चालना दिली होती. कारण त्यांना समाजात आर्थिक व सामाजीक विषमता माण्य नव्हती. गांधी हे जातीच व्यवस्थेच्या विरूध्द होते परंतू ते वर्ण व्यवस्थेचे समर्थक होते. कारण जर समाजातील आर्थिक सामाजीक विषमता दुर करावयाची असेल तर त्यांनी पारंपारीक उद्योगाचा स्विकार केला पाहीजे. ज्या वर्णात जी व्यक्ती आहे त्या वर्णातील व्यावसाय केला पाहीजे हा व्यावसाय प्रमातून उभा केला पाहीजे जेनेकरूण व्यावसायात स्पर्धा निर्माण होणार नाही. समाजातील कोणता ही व्यावसायीक आपाल्या क्षमत पेक्षा जास्त नफा मिळवीण्याचा प्रयत्न करणार नाहीत यातून गांधी असे म्हणतात कि सर्व व्यावसाय सारख्या दर्जाचे निर्माण होतील त्यात कोणताही व्यावसाय हालका किंवा प्रतीकेचा नसेल गांधीनी प्रत्यके व्यावसायात प्रमाला म्हत्व दिले आहे जिवन जगण्यासाठी श्रम हे महत्वाचे आहे मग ते बौध्दो श्रम अरणे किंवा शारिरीक श्रम असो ते समाजासाठी महत्वाची मानली पाहीजे. सर्व व्यावसायाना समान प्रतिष्ठा मिळाली पाहीजे जे व्यावसायीक व्यावसाय चालवतात त्यांच्यात मोठया प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण होणार नाही याची काळजी घमेली पाहीजे अशा पध्दतीत पांरपारीक उद्योग श्रमावर व वर्ण व्यवस्थेवर उभ राहीले पाहीजे असे मत म.गांधी याच होते.

निस्कर्ष

म.गांधी हे एक आर्थिक विचार वंत होते. त्यानी यंत्रयुगाला विरोध केला. कारण देशातील प्रत्यके व्यक्तीला काम मिळाले पाहीजे व प्रत्येकानी व्यावसाय उद्योग श्रमातुन उभा केला पाहिजे ते श्रमाला महत्व देत असत. गांधी हे जाती व्यवस्था मानत नसत परंतू वर्ण व्यवस्थेचे पुरस्कात होते समजानी आपल्या वर्णा नुसार व्यावसाय केला पाहिजे आणि ते पांरपरिक पध्दतीने केला पाहीजे असे मत गांधी यांनी मांडले कारण समाजातील आर्थिक व सामजीक विषमता दुर होइल व देशातील अनेक प्रश्न्न सुटतील असे गांधी यांचे मत होते.

संदर्भ

०१ भारतीय राजकीय विचारवत – कृ. दि बारोळकर
०३ भारतीय राजकीय विचांरवत – प्रा. डॉ. श्शुभांगी राठी
०३ हिन्दं स्वराज्य – म. गांधी
०४ स्वदेशी विचार यात्रा – विनोबा भावे
०५ साधना सप्माचिक.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani